SAMATA SHIKSHAN SANSTHA, PUNE'S

**DR. BABASAHEB AMBEDKAR COLLEGE OF SOCIAL WORK,**

**MORANE (NAKANE) DHULE (MAHARASHTRA)**

NAAC ACCREDITED 'B' Grade with CGPA 2.52

Ph. (02560) 275289 Email : msw_college@rediffmail.com

WebSite : www.drbacsw.com






# रमाई पोळी भाजी केंद्र

रमाई पोळी भाजी केंद्र

# रमाई पोळी भाजी केंद्र
## एक अभिनव उपक्रम

समता शिक्षण संस्था, पुणे संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे,धुळे येथे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षी १ जुलै २०१७ रोजी रमाई पोळी भाजी केंद्राची सुरुवात झाली. या केंद्राचा पहिला वर्धापन दिन २ जुलै २०१८ रोजी साजरा करीत आहोत.

समता शिक्षण संस्थेची सुरुवात गरीब, गरजु, आदिवासी आणि ग्रामीण कुटुंबातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे या उद्देशाने करण्यात आली. गेली ४५ वर्षे ही संस्था समाज परीवर्तनाच्या चळवळीमध्ये सक्रीय असल्याचे दिसून येते.संस्थेचे सचिव, प्रा.विलास वाघ आणि त्यांच्या पत्नी प्रा. उषा वाघ या दापंत्याने पुण्यामध्ये १९७२ साली संस्थेच्या कार्याची सुरुवात केली. समता शिक्षण संस्थेबरोबरच सर्वेषां सेवा संघ, सुगावा प्रकाशन या संस्था स्थापन करुन हे दांपत्य समाज कार्यामध्ये अविरतपणे सेवा करीत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयाने फक्त शिक्षण देण्याचे काम करु नये तर ते सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे महाविद्यालय बनावे, महाविद्यालयामध्ये गरीब, आदिवासी, ग्रामीण भागातुन येणारा विद्यार्थी हा पूर्णपणे सक्षम बनावा आणि त्यासाठी महाविद्यालयामध्ये शिक्षण हे केवळ पुस्तकी असू नये तर क्षेत्रकार्यामधुन विद्यार्थ्यांना गावांमध्ये परिवर्तन घडवून आणता आले पाहिजे,. असे प्रा.विलास वाघ यांचे स्वप्न आहे.गावातील लोकांच्या गरजा व समस्या ओळखुन मोठे काम उभे केले पाहिजे या स्वप्नाच्या पुर्ततेसाठी एक नवीन संकल्पना उदयास आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयामध्ये येणारे ९० टक्के विद्यार्थी हे ग्रामीण व आदिवासी भागातुन येतात. मालेगाव, शिरपुर, साक्री यासारख्या ठिकाणाहुन ५० ते ६० कि.मी अंतरावरुन विद्यार्थी सकाळी महाविद्यालयामध्ये येतात आणि ८ तास महाविद्यालयामध्येच असतात.बरेच विद्यार्थी हे पहाटे ४ ते ५ वाजता घर सोडतात त्यामुळे घरुन जेवणाचा डबा आणणे शक्य होत नाही.तसेच त्याची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे बाहेर नास्ता किंवा जेवण करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. विद्यार्थी उपाशीपोटी शिक्षण घेऊ शकत नाही. म्हणुन प्रा.विलास वाघ सरांनी एक अभिनव संकल्पना मांडली.त्या संकल्पनेचे नाव आहे.''रमाई पोळी भाजी केंद्र'' आणि या उपक्रमाला महाविद्यालयाने मूर्त स्वरुप आणले.

### उपक्रमाचे उद्देश -

१. महाविद्यालयातील गरीब आणि गरजु विद्यार्थ्यांची उपासमार कमी करुन भुकेल्या विद्यार्थ्यांना योग्य वेळी अन्न देण्यासाठी तसेच शिक्षण घेतांना विद्यार्थी उपाशी पोटी राहु नये म्हणुन रमाई पोळी भाजी केंद्र हे सुरु करण्यात आले.

२. भोजनाच्या सोयीमुळे वर्गातील उपस्थितीवर चांगला परिणाम होऊन विद्यार्थ्यांची गैरहजेरी कमी करणे.

३. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी.

### रमाई पोळी भाजी केंद्राची सुरुवात -

रमाई पोळी भाजी केंद्र या नाविण्यपुर्ण उपक्रमांसाठी हा स्वप्नरुपी प्रकल्प अस्तित्वात आणण्यासाठी तसेच तो कायमस्वरुपी चालविण्यासाठी योजना आखण्यात आली.फक्त ५रु./- नाममात्र दराने पोळी भाजी देण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी गरीब आणि गरजु विद्यार्थ्यांची यादी तयार करण्यात आली.

## लाभार्थी विद्यार्थी निवड प्रक्रीया

एकुण ४० विद्यार्थी लाभार्थी म्हणुन सुरुवातीला घेण्याचे ठरविण्यात आले त्यासाठी प्रत्येक प्राध्यापकाने त्यांच्याकडे क्षेत्रकार्यासाठी जे विद्यार्थी आहेत, त्यामधुन जे विद्यार्थी खुप गरीब आहेत. अशा विद्यार्थ्यांची यादी केली.विद्यार्थ्यांची माहिती घेण्यासाठी एक सर्वेक्षण फॉर्म तयार करण्यात आला.

२. विद्यार्थ्यांची खरी माहिती भरुन घेण्यासाठी त्यांच्या घरी भेट देण्यात आली.

३. प्रत्येक प्राध्यापकाने साधारणपणे चार विद्यार्थ्यांच्या घरी भेट देवुन सर्वेक्षण फॉर्म भरले.

४. प्रत्येक लाभार्थी विद्यार्थ्यांला रमाई पोळी भाजी केंद्राच्या लाभाची माहिती देण्यात आली आणि अंतीम यादी तयार करण्यात आली.

## जेवण तयार करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टर ची निवड -

१. सर्वप्रथम कमी दराने गुणवत्तापुर्वक जेवण तयार करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टर ची निवड योग्य प्रकारे करणे हे सर्वात महत्वाचे होते. त्यासाठी वेगवेगळ्या कॉन्ट्रॅक्टर कडुन कोटेशन्स मागविण्यात आले.

२. एकुण चार कॉन्ट्रॅक्टर कडुन कोटेशन प्राप्त झाली.

३. त्यापैकी एका कॉन्ट्रॅक्टर ने ही संकल्पना फार आवडल्याचे अणि या चांगल्या सामाजिक उपक्रमासाठी एक सामाजिक जाणीव म्हणुन रु. २०/- या नाममात्र दराने पोळी भाजी देण्याचे कबुल केले. ना नफा ना तोटा या तत्वाप्रमाणे पोळी भाजी पुरविण्याचे मान्य केले. पण विद्यार्थ्यांना मात्र रु. ०५/- या दराने ही पोळी भाजी देण्याचे ठरविण्यात आले. म्हणुन उर्वरित १५ रु. हे महाविद्यालयस मिळालेल्या देणगीतुन देण्याचे ठरले

## उद्‌घाटन -

पोळी भाजी केंद्राचे उद्‌घाटन दि. ०१ जुलै २०१७ रोजी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य मा. पी. डी दलाल (माजी आमदार) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समता शिक्षण संस्थेचे सचिव प्रा.विलास वाघ, प्रा.उषाताई वाघ आणि मान्यवर उपस्थित होते.

## रमाई पोळी भाजी केंद्राची संचालन प्रकीया -

१. महाविद्यालयाच्या तासिकामधील मध्यांतर वेळेत (सकाळी १०.३० ते ११.००) रमाई पोळी भाजी केंद्र सुरु करण्यात येते

२. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ०५ रु. दराने ३ चपाती आणि ०१ भाजी असे जेवण वाटप करण्यात येते

३. महाविद्यालयातील इतर गरजु विद्यार्थ्यांनाही या उपक्रमाचा लाभ घेता यावा म्हणुन त्याचे वेगळे रजिस्टर तयार केले असुन त्यांनाही ५ रु./- दराने पोळी भाजी वाटप करण्यात येते.

## महाविद्यालयाचा सहभाग -

१. एक प्राध्यापक आणि एक शिक्षकेतर कर्मचारी असे एकुण २ कर्मचारी याप्रमाणे प्रत्येक महिन्याला पोळी भाजी वाटपाचे काम देण्यात येते. माहे जुन ते मार्च या महिन्यामध्ये ०८ प्राध्यापक आणि ०८ शिक्षकेतर कर्मचारी या प्रक्रियेमध्ये सहभागी होवुन हे कार्य करीत आहेत.

२.पोळी भाजी केंद्राचा प्रत्येक महिन्याचा हिशोब लेखापाल यांच्याकडे जमा करण्यात येतो

३. या केंद्राची देखरेख व समन्वय करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य , ०४ प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी ०२ विद्यार्थी यांची एक कोअर कमिटी करण्यात आली आहे. अशा प्रकारे महविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी या कामात सहभागी आहेत.

## कोअर कमिटी -

सदर उपक्रम यशस्वीपणे चालविण्यासाठी आणि वेळोवेळी देखरेख करण्यासाठी एक कमिटी स्थापन करण्यात आली आहे. या कमिटीची त्रैमासिक बैठक आयोजित करुन पोळी भाजी केंद्राचा आढावा मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येतो.

रमाई पोळी भाजी केंद्र

## निधीची उपलब्धता -

रमाई पोळी भाजी केंद्र हे अखंडीतपणे चालावे यासाठी पुरेशा निधीची आवश्यकता आहे. त्यासाठी समाजातील विविध दानशुर व्यक्तींकडे देणगीसाठी आवाहन करण्यात आले. हॅण्डबील वाटप करण्यात आले आणि निधी गोळा करण्यात आला. काही गावांमधुन धान्य गोळा करण्यात आले आणि हे गोळा झालेले धान्य विकुन निधींमध्ये रक्कम जमा करण्यात आली.अशा प्रकारे सामाजिक कार्यकर्ते प्राध्यापक व सर्व कर्मचारी यांनी वेगवेगळ्या सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते दानशुर व्यक्तींकडुन आजतागयत १०,५२,७७४/- रुपये निधी गोळा केलेला आहे.

हा निधी बँकेत ठेव म्हणुन ठेवण्यात आला असुन त्यातुन मिळणाऱ्या व्याजातुन हे रमाई पोळी भाजी केंद्र चालविण्यात येते

## रमाई पोळी भाजी केंद्राची प्रसिध्दी-

धुळे जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्रे आणि स्थानिक टिव्ही चॅनेलवर या उपक्रमाची माहिती प्रसारित करण्यात आली.तसेच या उपक्रमाची दखल विद्यापीठ, विविध महाविद्यालये आणि सामाजिक संस्था, कार्यकर्ते व प्राध्यापकांनी घेतली असुन या उपक्रमाची सर्वत्र स्तुती होत आहे.

## भविष्यकालीन योजना-

सदर उपक्रम महाविद्यालयाचा निरंतर चालणारा उपक्रम होईल आणि जास्तीत जास्त विद्यार्थी या पोळी भाजी केंद्राचा लाभ घेतील अशी महाविद्यालयाची योजना आहे

अशा प्रकारे अतिशय नाविण्यपुर्ण संकल्पना योग्य नियोजन करुन संस्थेचे सचिव प्रा. विलास वाघ आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सरांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षभरापासुन महाविद्यालय राबवत आहे. या योजनेसाठी विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्राध्यापकांचा सुध्दा सहभाग आहे. या सर्वांच्या सहकार्यानेच ही योजना यशस्वी झाली आहे.

### रमाई पोळी भाजी केंद्रासाठी प्राप्त एकुण देणगी तपशील-

| | |
|---|---|
| श्री.समर्थ देसाई व रीता देसाई | १,५०,०००/- |
| प्रा.श्री.विलास वाघ | ७५,०००/- |
| श्री.सुभाष गुप्ता | ५०,०००/- |
| श्री.विवेक सुंदरा | ५०,०००/- |
| एस.पी.पीपल्स् ट्रस्ट मुंबई | २५,०००/- |
| गीता बालकृष्णन | २०,०००/- |
| नीना शहा मोरे | १०,०००/- |
| श्री.राजेश भतवाल | १०,०००/- |
| पुरुरी रामकृष्णन | १०,०००/- |
| महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व इतर दानशुर व्यक्ती | ६,५२,७७४/- |
| एकुण जमा निधी | १०,५२,७७४/- |
| एकुण खर्च(२०१७-१८) | ४३,२९०/- |
| एकुण शिल्लक निधी | १०,०९४८४/- |

**रमाई पोळी भाजी केंद्र कोअर कमिटी सदस्य**

प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे

प्रा.डॉ.रघुनाथ महाजन प्रा.गोपाळ निंबाळकर

प्रा.प्रीती वहाणे प्रा.रचना अडसुळे



